नियमीत फौ. ख. क्र. १०६/२०२४
सरकार -वि.- संदिप व इतर
नि.क्र. ६.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - प्रकाश फकीरा धाडसे,
वय ४५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
राहणार – भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

<u>**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री जी. बी. राऊत यांचे मार्फत**</u>

१. मी आरोपीला ओळखत नाही. दिनांक १९.०५.२०२४ रोजी पोलिसांनी मला समन्स दिला नव्हता. पोलिसांनी माझ्या समक्ष कुठलिही कार्यवाही केली नव्हती. आता मला सूचनापत्र व घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्या वरील सहीला **नि.क्र.७** देण्यात येते.

सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १९.०५.२०२४ रोजी पोलिसांनी मला भिवापूर तास रोडवर, ता. भिवापुर येथे पंचनाम्याकरिता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समक्ष एक रेतीचा टिप्पर क्रमांक एम.एच.४०-बी.एल.६१९१ व त्यामध्ये ५ ब्रास रेती

आरोपीच्या ताब्यातुन जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तसा घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला व मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, श्रीधर बंडू कुशवाह हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा मित्र आहे त्यामुळे मी त्यांना वाचनविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोसे यांचे मार्फत**

३. नाकारला.

उलट तपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक – २२.१२.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.